## साहित्य अकादमी आयोजित साहित्य शृंखलेत रामदास भटकळ यांचे प्रतिपादन

# ग्रेस यांच्या रचनांमधील शब्द कधीही ऐकलेले नसायचे!

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**

**नागपूर :** ग्रेस आणि मी, तब्बल पाच दशकांचा आमचा संबंध. या पाच दशकांच्या कालावधीत त्यांची वेगवेगळ्या संदर्भातील अनेक बदलती रूपे मी पाहिली आहेत. माझ्या स्मरणात त्यांच्या बाबतीतल्या अनेक गोष्टी धूसर आहेत आणि रसिकांच्याही. पण, यातच ग्रेस आहते. फक्त तुम्हाला आणि मला त्यांना शोधायचे आहे. ग्रेसचे शब्द वेगळेच होते, कधी ते ऐकलेलेही नसायचे आणि मग हे शब्द विचार करायला लावायचे. त्यांना नेमके काय म्हणायचे ते शोधावे लागायचे, अशा शब्दात साहित्य अकादमीच्यावतीने ऑनलाईन साहित्य शृंखलेत लेखक, अनुवादक व प्रकाशक रामदास भटकळ ग्रेस यांच्या आठवणींना उजाळा देताना बोलत होते.

ग्रेसांची कविता प्रकाशित करण्यासाठी त्यांना केलेला दूरध्वनी आणि त्यानंतर सुरू झालेला पत्रव्यवहार यात आम्ही एकमेकांत कसे गुंतत गेलो कळलेच नाही. पुण्यातील मंगेशकर रुग्णालयात दाखल असताना मी त्यांना भेटायला गेलो, तेव्हा त्यांनी मला एकेरी संबोधले आणि त्यात त्यांच्या आयुष्यभराच्या भावना व्यक्त झाल्या.

'आय ॲम फ्री, बट आय ॲम नॉट अव्हेलेबल' ही नागपुरातील त्यांच्या घराच्या दारावरील पाटी वाचून अनेकांचे पाय थबकत होते. मात्र, ते मनाने मोकळे होते. अनेकांना ते भेटायचे. ग्रेस यांची खरी ओळख ही त्यांच्या लेखणीतूनच होते. संदर्भ नावाचे त्रैमासिक मी सुरू केले तेव्हा ग्रेस यांच्यावर संपादनाची जबाबदारी सोपवली. यावेळी अनेक मोठ्या लेखकांकडून त्यांनी लेख मागवले, पण विषय मात्र ग्रेस यांनी दिलेले असायचे.

अमेरिकेतील आंतरराष्ट्रीय प्रकाशक परिषदेला मला बोलावणे आल्याचे कळताच त्यांनी मला एक काम सोपवले. तिथल्या एका अभिनेत्रीला त्यांना पुस्तक द्यायचे होते आणि तिचे सहीनिशी छायाचित्र हवे होते. ही तारेवरची कसरत मी पार पाडली आणि त्यानंतर आमचे नाते अधिक दृढ झाले.

एका समृद्ध माणसासारखे ग्रेस माझ्या वाट्याला आले. मुंबईत दूरदर्शन सुरू झाले तेव्हा प्रतिभा आणि प्रतिमा या कार्यक्र मात ग्रेस यांची मुलाखत हृदयनाथ मंगेशकर आणि खानोलकर यांनी घेतली.

ग्रेस यांच्या लेखनावर टीकाही झाली आणि सोबतच त्यांचे लेखन प्रसिद्ध करणाऱ्या आमच्या पॉप्युलर प्रकाशनावरही. पण, ग्रेस अद्वितीय आहेत हे मला माहिती होते आणि त्यामुळेच मी ग्रेस यांचा समर्थक राहिलो, असेही रामदास भटकळ यांनी सांगितले.